# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२२/०५/२०१८
## दि.२१/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ३५१/१८,भादविक २७९,३३८,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | प्रविण चव्हाण,वय-३८ वर्षे,रा.ओटा स्कीम निगडी,पुणे |
| **आरोपी** | अमरेन्द्र क्रुष्णाचंद साहु,वय-३२ वर्षे,रा.पीसीएमसी कॉलनी,ओटा स्कीम,निगडी,पुणे (जखमी) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०४/२०१८ रोजी २१/३० वा. बीआरटी बस स्टॉप डेपो,जुना निगडी जकात नाका भक्ती शक्ती चौक,निगडी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडील तानाजी बबन चव्हाण,वय-६७ वर्षे,रा.पीसीएमसी कॉलनी,ओटा स्कीम,निगडी,पुणे हे नमुद इसम अमरेन्द्र साहु याचे मोटार सायकलवरुन त्यांचे राहते घरी येत असताना,त्याने त्याचे ताब्यातील दुचाकी ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी त्यांचे गाडीला श्वान आडवे आल्याने दोघे मोटार सायकलवरून खाली पडुन,त्यामध्ये अमरेन्द्र हे किरकोळ जखमी होवुन, तानाजी चव्हाण यांना गंभीर जखमी केल्याने,त्यांचेवर वैदयकीय उपचार चालु असताना ते दि.०४/०५/२०१८ रोजी सकाळी ११/४७ वा. मयत झाले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.सुर्यवंशी ९७६७८५११०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे २४८/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | वरूण जैन,वय-३०,रा.जुनी सांगवी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०१८ रोजी सकाळी ०९/३० वा. ते १९/३० वा. चे दरम्यान फ्लॅट नं.३,श्री हरी कृपा,प्रियदर्शीनीनगर गल्ली नं.५,जुनी सांगवी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील सोन्याचे दागिने असा एकुण ४,२९,०००/- रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. बी.ए.ननवरे ८२७५४६२४९५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३१४/१८,भादविक ३०४(अ),३३७,३३८ |
| **फिर्यादी** | एस.जी.वाणी, सहा.पो.फौज. कोंढवा पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.बिल्डर २.इंजिनिअर ३.बांधकाम कॉनट्रॅक्टर ४.सेफ्टी सुपरवायजर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०५/२०१८ रोजी २१/०० वा.साई व्दारीका बांधकाम साईड मधील बिल्डींग नं.बी शेजारी येवलेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | कोंढवा पो स्टे अ.मयत रजि.नं.७३/१८,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद इसम अनुक्रमे बिल्डर,इंजिनिअर, बांधकाम कॉनट्रॅक्टर व सेफ्टी सुपरवायजर यांनी त्यांचे येवलेवाडी येथील साई व्दारीका बांधकाम साईडवरील बिल्डींग नं.बी चे ११ व्या मजल्यावरील टेरेसवर बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता, |

| | |
|---|---|
| | इमारतीच्या टेरेसवरील पॅराफिटचे कमकुवत बांधकाम केल्याने नमुद वेळी व ठिकाणी झालेल्या जोरदार वा-यामुळे सदर बिल्डींगवरील टेरेसचे पॅराफिटचे बांधकामाचे सीएलसी ब्लॉक हे इमारतीचे लगत असलेल्या लेबर कॅम्पवर पडुन,कामगार अनबर ताजुद्दीन आलम, वय-२२,रा.साई दारीका लेबर कॅम्प,येवलेवाडी,पुणे हे मयत झाले. तसेच दुर्गेश पुसव निसाद, वय-२५ वर्षे व मुलगा परमेश्वर दुर्गेश निसाद,वय-०४ वर्षे हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पावसे ८१०८१८१८६४ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १०६/१८,भादविक १४३,१४६,३२३,५०४,४२७,महाराष्ट्र वैद्यकीय सेवा देणारे व्यक्ती व संस्था यांचे हिंसाचार व नुकसान प्रति.अधि.क.४ प्रमाणे |
| **फिर्यादी** | नितीन महाबळ,वय-३८,रा.कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | १.विठठल बबन वाघमारे,वय-३९ २.सिध्देश्वर तानाजी गायकवाड,वय-२४ ३.अनिकेत भारत रणदिवे,वय-२४,सर्व रा.तळजाई वसाहत,तळजाई पठार,पुणे (अटक) एकुण ८ ते १० इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०१८ रोजी पहाटे ०१/३० वा. दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल,एरंडवणा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल,पुणे येथे असी.मॅनेजर ॲडमिनिस्टेड या पदावर आहेत. नमुद हॉस्पीटल मध्ये दाखल असणा-या एका पेशंट महिलेवर उपचार चालु असताना,उपचारादरम्यान ती मयत झाल्याचे कारणावरून,तीचा पती दत्ता वाघमारे याने चिडुन जावुन तीचे मृत्युस हॉस्पीटल मधील डॉक्टर जबाबदार आहेत असे समजुन,डॉक्टर चेतन महाजर यांना धक्का-बुक्की करून,इतर साथीदारांनी हॉस्पीटल मधील दरवाजाची काच फोडुन,पहिल्या मजल्यावरील तीन खुर्च्या व दोन बेंच हे तळमजल्यावरील स्वागत कक्षात फेकुन तेथील मॉनिटर,फोन व इतर साहित्य याचे सुमारे ३० हजार रू किचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.डी.जाधव ९९२३१०३८२३ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे २०४/१८,भादविक १४३,१४४,१४७,१४८,१४९,३२४,५०४,५०६,४२७ |
| **फिर्यादी** | राहुल शिंदे,वय-४३,रा.पर्वती पायथा,सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपी** | एकुण आठ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०१८ रोजी २३/३० वा.फिर्यादी यांच्या राहते घरात व घरासमोर स.नं.१३२,पर्वती पायथा,सिंहगड रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वस्तीत राहणारे नवनाथ शेडगे व त्यांचे दोन मुलाबरोबर फिर्यादी यांचा मुलगा शुभम शिंदे यांची किरकोळ बाचाबाची होवुन,त्यांनी फिर्यादी यांचे मुलाचे विरुध्द दत्तवाडी पोलीस चौकी येथे तक्रार दिली होती. तरीदेखील सदर इसमांनी इतर साथी दारांसह फिर्यादी यांचे घरी येवुन शुभम यास शिवीगाळ व लाथा-बुक्यांनी मारहाण करुन, त्यांचे घरातील वस्तुची काठीने तोडफोड करुन,सुरज शेंडगे यांने फिर्यादी यांचे डोक्यात वीट घालुन त्यांना जबर जखमी करून,शुभम यास जीवे ठार मारण्याची धमकी देवुन,विनाकारण फिर्यादी यांचे घरा जवळील स्पंदन फॅमिली केअर या दवाखान्याच्या काचा फोडुन,सदर भागात दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. साळवे ७५८८१७५१८८ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३४२/१८,भादविक ४२०,महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर कायदा सन २००२ चे कलम ७४(१)(अ),(१)(ब),(२),(४),(५) प्रमाणे |
| **फिर्यादी** | श्रीमती.सारिका देसाई,सहाय्यक राज्यकर आयुक्त,पुणे |
| **आरोपी** | मेसर्स- एस.पी.एन्टरप्रायझेसचे मालक संतोष अवदेश पांडे,रा.चिंतामणी सोसा.साईनगर, मामुर्डी, देहुरोड(सीबी),ता.हवेली,जि.पुणे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१२ या आर्थिक वर्षापासून ते आजपावेतो वस्तु व सेवा कर भवन येरवडा,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया वस्तु व सेवा कर भवन येरवडा,पुणे येथे सहायक राज्यकर आयुक्त या पदावर काम पाहत आहे. यातील मेसर्स एस.पी.एन्टरप्रायझेसचे मालक संतोष अवदेश पांडे याने सन २०१२ या आर्थिक वर्षापासुन ते आजपावेतो त्यांचे व्यवसायाचा (अनियमांप्रमाणे व्याज व दंड असे सर्व मिळुन) एकुण ३५,३७,४६०/- रुपयेचा भरणा शासकीय तिजोरीत न भरता,त्यांचे वैयक्तीक फायदयाकरीता वापर करून शासनाची फसवणुक केलली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. लोहार ९८५०२२३१९० |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३१७/१८,भादविक ३०९ |
| **फिर्यादी** | आर.एच.शेख, पोलीस हवालदार, कोंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | रफीक हुसेन शेख,वय-२३ वर्षे,रा.गल्ली नं.१२,भाग्योदयनगर,कोंढवा-खुर्द,पुणे (जखमी) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०१८ रोजी सायं. १७/३० वा. कोंढवा पोलीस स्टेशनचे तपास पथकातील रुम मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद इसम कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.५३/२०१८,भादविक ४५७,३८० या गुन्हया मध्ये त्याची चेहरेपट्टी घेत असताना,त्याने अचानकपणे मोठ-मोठयाने आरडा-ओरडा करुन,फिर्यादी यांनी त्याची चेहरेपट्टी घेवु नये,त्यास अटक करु नये याकरीता,फिर्यादी यांचेवर दबाब यावा म्हणुन,जीव देण्याचे इरादयाने अचानक तपास पथकातील खिडकीचे काचेला स्वतः जोरात धडक मारून,त्यामध्ये स्वतःला जखमी करुन,आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शिंदे ९९२२९५५४७० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**